राज्य स्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे
आयोजनाकरिता निधी वितरण

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१८ /प्र.क्र.७६ /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २६ मार्च, २०१९

वाचा

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२३१/क्रीयुसे-१, दि. १३.०२.२०१४.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.निविप्र ४०१८/प्र.क्र.७६/क्रीयुसे -२; दि.०६.०६.२०१८
३. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अर्थसं - २०१८ / प्र.क्र ६९ /अर्थसं-३ ,दि.२५.०१.२०१९.
४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र.शिक्रीपी/तरतूद/क्रीप्रकें/निवि/२०१८-१९/का-१३/१७५९; दि.२१.०२.२०१९

प्रस्तावना -

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २०१२ मध्ये राज्य स्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याबाबत तरतुद आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र.०१ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावरील क्रीडा शिबिराचे आयोजन या योजनेस मान्यता देण्यात आली असुन या योजनेंतर्गत १५ खेळ प्रकारातील खेळांसाठीच्या सुविधा व निवास सुविधा उपलब्धतेनुसार तालुका/जिल्हा/विभागीय क्रीडा संकुल/शिवछत्रपती क्रीडा नागरी संकुल,महाळुंगे,पुणे येथे करण्यात येते.

उपरोक्त संदर्भाधीन क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ या वर्षामध्ये खेळाडूकरिता राज्यस्तरीय क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी अर्थसंकल्पित निधीपैकी ७० टक्के निधी वितरीत करण्यात आला आहे. वित्त विभागाच्या दि.२५.०१.२०१९ च्या परिपत्रकानुसार उर्वरीत निधीपैकी ८० टक्केच्या मर्यादेत निधी वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या वर्षा मध्ये राज्यस्तरीय क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यारीता रु.१५०.०० लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी रु.१५.०० लक्ष (रुपये पंधरा लाख फक्त) इतकी रक्कम वितरित करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणाऱ्या खर्चासाठी “मागणी क्र. ई-३, २२०४-क्रीडा व युवक सेवा- १०४ क्रीडा व खेळ (०९) खेळाडूंना शिष्यवृत्त्या व पुरस्कार (०९) (१६)राज्य स्तरावर क्रीडा प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, (२२०४ ५६२६) (कार्यक्रम) ३१, सहायक अनुदान (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदी मधून निधी वितरीत करण्यात यावा.

उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. वित्त विभाग दिनांक २५.०१.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत उपसंचालक/जिल्हा क्रीडा अधिकारी/ लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२६१५०५५०६६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.26 15:09:39 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२)